<u>नि. ४६ खाली आदेश</u>

१. सदर वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी नं.३ चे वारस रेकॉर्डवर घेणे बाबत झालेल्या आदेशानुसार दाव्यात दुरुस्ती करणेस परवानगी मिळणे बाबत दाखल केलेला आहे.

२. वादीचे म्हणणे असे की, सदरील दाव्यामधील प्रतिवादी नं ३ पाराबाई चिकणे या मयत झालेल्या आहेत. त्यांचे वारस रेकॉर्डवर घेण्याचा आदेश दि. ३०/१०/२०१९ रोजी झालेला आहे. परंतु नजरचुकीने सदरची दुरुस्ती दाव्यामध्ये करणेचे राहुन गेलेले आहे. सदरची दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत दाखल करण्यास परवानगी देण्याची विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी यांनी म्हणणे दिले की, सदरचा दावा प्रतिवादी विरुध्द अबेट झालेला आहे. प्रस्तुतचा अर्ज कोणत्या प्रोव्हीजन नुसार केला आहे हे नमुद नाही. नि.क्र ३९ वरील प्रमाणे पूर्तता न केल्याने दावा अबेट झाला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज रदद करण्याची विनंती केली आहे.

४. प्रस्तुत दाव्यामध्ये वादी वारंवार गैरहजर असल्याने वादीस दाव्याची नोटीस काढण्यात आली होती व त्याप्रमाणे वादी दाव्यामध्ये हजर झालेले आहेत. प्रस्तुत प्रकरणामध्ये दि.०३/१०/२०१९ रोजी नि.क्रं ३९ वरील आदेशाप्रमाणे दाव्यामध्ये प्रतिवादी क्रं ३ चे वारस सामील करण्याबाबत आदेश झालेला आहे. प्रस्तुत अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुतची दुरुस्ती करण्यास बराच विलंब झालेला आहे. परंतु दाव्याचे स्वरुप ध्यानात घेता वादीने नमूद केलेली कारणे सदर दावा दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत दाखल करण्यायोग्य आहेत. सदरचा विलंब माफ न केल्यास वादीचे नुकसान होण्याची शक्यता आहे. तसेच प्रतिवादी नं ३ चे वारस दाव्यात सामील केल्यास व दावा दुरुस्त प्रत दाखल केल्यास सदरचा दावा गुणदोषावर चालविण्यास मदत होणार आहे. वादीने सदर दावा दुरुस्ती

करुन दुरुस्त प्रत दाखल करण्याबाबत नमुद केलेली कारणे समाधानकारक व संयुक्तीक आहेत. वादीस प्रस्तुत दावा दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत दाखल करणेस बराच विलंब झालेला आहे. त्यामुळे वादी वादखर्च देण्यास पात्र आहे. वरील सर्वबाबी व परिस्थितींचा विचार करता प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे. त्याप्रमाणे खालील आदेश पारित करण्यात येतो:

<u>आदेश</u>

१. अर्ज (नि.४६ ) मंजूर करण्यात आला.

२. वादीने वादखर्च रक्कम रु.१००/- प्रतिवादींना द्यावी.

३. वादीस नि.क्र ३९ वरील आदेशाप्रमाणे दावा दुरुस्त करण्याची परवानगी देण्यात येते.

(ह.उ.उ.पाटील)
सह दिवाणी न्यायाधीश, भोर

दिनांक :१५/०७/२०२२

# Certificate

"I affirm that the contents of this P.D.F file Order are same word for word as per original Order.
Name of the Steno : V.G.Fulari
Court Name : H.U.U. Patil
Jt. C.J.J.D., Bhor, Dist. Pune.
Date : 15/07/2022
Order signed by presiding officer on : 16/07/2022
Order uploaded on : 18/07/2022.